# पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी ४११०१८

लेखा व वित्त विभाग

मुंबई पुणे रोड, पिंपरी, पुणे ४११ ०१८,

Website – pcmcindia.gov.in

E-mail – account@pcmcindia.gov.in


स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

जावक.क्र.लेखा/२९/कावि/९८६/२०२४ दिनांक :- २९/०८/२०२४

## परिपत्रक

विषय :- मनपा अंदाजपत्रकामधील तरतूदींच्या फेरबदलांबाबत.

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या सन २०२४-२५ चे वार्षिक अर्थसंकल्पास मा.महापालिका सभेच्या अंतिम मंजुरीनंतर दि.०१/०४/२०२४ पासून अर्थसंकल्पाची अंमलबजावणी करण्यात आली आहे. सदर अर्थसंकल्पाची अंमलबजावणी सुरू केल्यानंतर काही आठवड्यांच्या कालावधीमध्येच अनेक विभागांकडून अर्थसंकल्पीय भांडवली व महसुली कामांच्या तरतूदींचे वाढ-घट प्रस्ताव व अर्थसंकल्पात नविन कामांचा समावेश करणेबाबत प्रस्ताव सादर केल्याचे निदर्शनास आले आहे. यामुळे भांडवली व महसुली विभागांनी सन २०२४-२५ चे अर्थसंकल्प तयार करताना भांडवली व महसुली कामांची प्रगती व आवश्यक असणारी अंदाजपत्रकीय तरतूद याबाबत योग्य पध्दतीने आर्थिक नियोजन केल्याचे दिसून येत नाही. तसेच अर्थसंकल्पात नविन समाविष्ट करावयाच्या भांडवली/महसुली विकास कामांना नाममात्र तरतूद केल्याचे निदर्शनास आले आहे. सदरची बाब ही आर्थिक स्वरूपाची असून आर्थिक शिस्तीच्या दृष्टीने मनपाच्या हिताची नाही. यामुळे मनपाच्या एकुण दायीत्वामध्ये मोठ्या प्रमाणात वाढ होण्याची शक्यता आहे. आर्थिक शिस्त व आर्थिक नियोजनाच्या दृष्टीने सर्व संबंधित विभागांना खालीलप्रमाणे सुचना/आदेश देणेत येत आहेत.

1. वार्षिक अर्थसंकल्पास मा.महापालिका सभेने मंजूरी दिल्यानंतर किमान ६ महिने अर्थसंकल्पीय भांडवली व महसुली कामांच्या तरतूदींचे वाढ-घट प्रस्ताव व अर्थसंकल्पात नविन कामांचा समावेश करणेबाबत प्रस्ताव मंजूर केले जाणार नाहीत. अपवादात्मक परिस्थितीत मा.आयुक्त सो यांनी मान्यता घेणेत यावी. त्यानुसार सर्व संबंधित विभागांनी अर्थसंकल्प तयार करताना भांडवली व महसुली कामांची प्रगती / टप्पे व आवश्यक असणारी अंदाजपत्रकीय तरतूद याबाबत योग्य पध्दतीने अचूक अंदाज घेऊन आर्थिक नियोजन करण्याची कटाक्षाने दक्षता व खबरदारी घ्यावी. सुधारीत अंदाजपत्रकात वाढीव तरतूद गृहीत धरता येणार नाही आणि मागता येणार नाही. योग्य आर्थिक नियोजन न केल्याने आर्थिक अडचण निर्माण झाल्यास संबंधितांवर अर्थसंकल्पाचे कामकाजात हलगर्जीपणा केल्याबाबत शिस्तभंगाची कारवाई करणेत येईल. याची नोंद घ्यावी.
2. अंदाजपत्रकामध्ये नविन विकास कामे / प्रकल्पांचा समावेश करताना अंदाजपत्रकीय रक्कमेच्या किमान २५ % अथवा कामाची मुदत १ वर्षापेक्षा जास्त असल्यास कामाचा कालावधी गृहीत धरून त्या प्रमाणातच टक्केवारीची विभागणी करून ज्या त्या वित्तीय वर्षात तरतूद ठेवणेची दक्षता सर्व संबंधितांनी घ्यावी. अंदाजपत्रकात नविन काम समाविष्ट करताना नाममात्र तरतूद ठेवल्यास सादर कामांचा अंदाजपत्रकात समावेश केला जाणार नाही.
3. नविन विकास कामांच्या निविदा प्रसिध्द करताना तसेच निविदा कार्यवाही पूर्ण होऊन कामाचा आदेश संबंधीत कंत्राटदारास देताना सदर कामांना निविदा रक्कमेच्या किमान २५ टक्के तरतूद उपलब्ध असणे बंधनकारक राहील. त्याखेरीज कामाचा आदेश देणेत येऊ नये.

# पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी ४११०१८

लेखा व वित्त विभाग

मुंबई पुणे रोड, पिंपरी, पुणे ४११ ०१८,

Website – pcmcindia.gov.in

E-mail – account@pcmcindia.gov.in


स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

4. गेल्या तीन वर्षात उपलब्ध झालेल्या सरासरी सुधारीत अर्थसंकल्पीय निधीच्या १.२५ पट रकमेपेक्षा जास्त किंमतीच्या प्रशासकीय मान्यता एका वर्षी देता येणार नाहीत.
5. अंदाजपत्रकामध्ये कामांच्या तरतूदींमध्ये वाढ-घट केल्यास ज्या कामांमधून घट केलेली आहे अशा कामांना सुधारीत अंदाजपत्रकामध्ये वाढीव तरतूद दिली जाणार नाही. तसेच महसुली / अत्यावश्यक बाबींच्या कामांच्या तरतूदी भांडवली कामांवर वर्ग करून नयेत.
6. सर्व संबंधित विभागांनी त्यांची भांडवली / महसुली दायीत्वाची माहिती अद्यावत ठेवावी. विभागाचे दायीत्वाचे रजिस्टर ठेऊन त्यामध्ये दायीत्वाच्या नोंदी घेऊन दायीत्वामध्ये होणा-या बदलाच्या वेळोवेळी नोंदी अद्यावत ठेऊन विभागप्रमुखांनी त्या प्रमाणित कराव्यात. तसेच दायीत्व मर्यादित ठेवणेची कटाक्षाने दक्षता घ्यावी. कोणत्याही विभागाचे दायीत्व संबंधित विभागास वितरीत केलेल्या निधीच्या मर्यादेबाहेर गेल्याने मनपास आर्थिक अडचण निर्माण झाल्यास संबंधित विभागप्रमुखास जबाबदार धरणेत येईल. सर्व संबंधित विभागांनी त्यांची दायीत्वाची अद्यावत अचूक माहिती विभागप्रमुखांच्या स्वाक्षरीसह दर महिन्याचे ५ तारखेच्या आत लेखा विभागाकडे सादर करावी.
7. काही विभागांकडून रस्त्यांच्या कामांमधून इतर अन्य कामांवर तरतूद वाढ/घट करणेकामी प्रस्ताव सादर केल्याचे निदर्शनास आले आहे. रस्त्यांची कामे ही मुख्य पायाभूत सुविधेअंतर्गत मोडत असल्याने सदर कामांवरील तरतूद इतर कामांवर वळविणेत योग्य नाही. त्यामुळे यापुढे रस्त्यांचे कामाची तरतूद इतर कोणत्याही कामावर वर्ग करता येणार नाही.
8. अंदाजपत्रकामध्ये कोणताही बदल करावयाचा असल्यास विभागप्रमुखांनी प्रस्ताव मुख्य लेखा व वित्त अधिकारी तथा संचालक ( वित्त) यांचे अभिप्रायाकामी सादर करावेत. लेखा विभागामार्फत सदर प्रस्तावाची तपासणी करून योग्य असल्यास मा.आयुक्त सो यांचेकडे पुढील कार्यवाहीसाठी सादर करणेत येतील. मुख्य लेखा व वित्त अधिकारी तथा संचालक (वित्त) यांचे अभिप्रायाशिवाय विभागांनी परस्पर अंदाजपत्रकीय तरतूदी संदर्भातील प्रस्ताव मा.आयुक्त सो यांचे मान्यतेकामी सादर करू नयेत. तसेच मुख्य लेखा व वित्त अधिकारी तथा संचालक ( वित्त) यांचे अभिप्रायाशिवाय सादर केलेल्या प्रस्तावांची अंमलबजावणी केली जाणार नाही याची सर्व संबंधितांनी नोंद घ्यावी.

सदर परिपत्रकाची सर्व विभागप्रमुखांनी नोंद घ्यावी व सर्व संबंधित कर्मचारी यांचे निदर्शनास आणून देणेत यावे.

( शेखर सिंह )
आयुक्त तथ प्रशासक
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी

प्रति:- सर्व संबंधित विभागप्रमुख